# *सांगली शिक्षण संस्थेचे भारतीय स्वातंत्र्य लढयातील कार्य*

*मुल्ला हसिना शमशुद्दिन*
*एम. फील.*
*टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे.*



***प्रस्तावना :–***

विसावे शतकाचे सुरवात इंग्रजांच्या बंधनातून मुक्त होण्यासाठी उचललेले पाऊल आहे. इंग्रजांची राजकीय निती भारतीय सुशिक्षित तरुण वर्गाच्या लक्षात आली होती. मवाळाची ध्येये धोरणे न पटल्याने जहालांचा उदय झाला. सन १६ ऑक्टोबर १९०५ रोजी लॉर्ड कर्झनने बंगालच्या फाळणीचा निर्णय जाहीर केला आणि बंगालमध्ये तर आगडोंब उसळला होता. याच घटनेवर लोकमान्य टिळकांनी केसरीतून बंगालच्या असंतोषावर टिका केली. त्यांच्यावर खटला भरण्यात आला. त्यांना २२ जूलै १९०८ रोजी ६ वर्षाच्या काळया पाण्याची शिक्षा झाली. लोकमान्य टिळकांना मंडालेच्या तुरुंगात पाठवण्यात आले. त्याचे तीव्र पडसाद देशात उमटले. टिळक काळया पाण्यावर गेले त्यांच्याकरिता आपण एक दिवस तरी काम थांबविणे आपले कर्तव्य आहे ही लाखो गिरणी कामगारांची भावना होती. यातून देशातील कामगारांचा पहिला संप झाला. ''लोकमान्य टिळक मंडालेच्या तुरुंगातून सुटले (१९१४) या घटनेचा आनंद सांगलीतील तरुणांनी अनोख्या पद्धतीने साजरा केला. १) स्व. धोंडो विठ्ठल सखदेव, २) स्व. विनायक सदाशिव जोशी, ३) ब्रहमीभूत गुरुनाथ गोविंद तोरो, ४) स्व. राजाराम रावजी चिकोडीकर यांनी ४ डिसेंबर १९१४ रोजी 'सिटी स्कूल' ची स्थापना केली. त्यावेळी एक विद्यार्थी आणि संस्थापक हेच चार शिक्षक होते''. [1]

लोकमान्य टिळकांच्या चार चतु:सूत्रीमधील एक सूत्र राष्ट्रीय शिक्षण हेच ध्येय डोळयासमोर ठेवून साध्या पद्धतीने शाळेची सुरुवात केलेली दिसते. तसे पाहता १९१४ चा कालखंड म्हणजे पहिल्या महायुध्दाचा कालखंड, युध्दाच्या झळा या सर्वांनाच भोगव्या लागल्या होत्या. तरीही संस्थापकांची जिद्द मोठी, ध्येय विशाल होते. चारित्र्यसंपन्न, देशाभिमानी, शरीरश्रमाची आवड असलेली स्वावलंबी विद्यार्थी त्यांना घडवायचा होता. त्यासाठी शालेय शिक्षणाबरोबर व्यायाम, खेळ, नैतिक शिक्षण, हस्त व्यवसाय, विद्यार्थी सहकारी भांडार, संगीत, समाजसेवा अशासारख्या पूरक विषयांची जोड देवून विद्यार्थी जीवन समृध्द व समाजोपयोगी करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न या संस्थापकांनी केला आहे.

१९ सप्टेंबर १९१९ मध्ये 'सांगली एज्यूकेशन सोसायटी' ची स्थापना झाली. पुढे तिचे '' सांगली शिक्षण संस्था'' असे नामकरण झाले. आणि 'सिटी स्कूलचे' सिटी हायस्कूल असे नामकरण झाले. सिटी हायस्कूल पासून सुरु झालेला प्रवास बुधगाव, तासगाव, विटे, लेंगरे, सांगली, अंकली, पुणे असा विस्तार झालेला आहे.

आजही संस्थेचा लौकिक ''राष्ट्रीय शिक्षण देणारी संस्था म्हणूनच आहे''[2] १९२१ पासून या शाळेत ड्रॉईंग ग्रेड परिक्षा सुरु झाली. विणकाम, सुतारकाम, सायकल दुरुस्ती अशा व्यवसाय शिक्षणातून सांगली शिक्षण संस्थेची औद्योगिक शाखा सुरु झाली. सामाजिक जाणीव विद्यार्थ्यांना निर्माण होण्यासाठी इंन्फ्लुएंझाच्या विनायकराव जोशींनी शाळेत मोफत दवाखाना चालविला, पूरग्रस्त निधी, अंधनिधी, साहित्य संमेलन, शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत, ध्वजनिधीसाठी संस्थेने भरीव निधी दिला आहे.

ज्योतिष संमेल्लनाकरिता लो. टिळक सांगलीस १९२० साली आले होते. त्यावेळी श्री. बळवंतराव गोडबोले सिटी हायस्कूलचे मुख्याध्यापक होते ते लोकमान्यांना निमंत्रण देण्याकरिता छापखाने वकिलांच्या बंगल्यांवर गेले असताना लोकमान्यांचा सांगलीत कार्यक्रम पंधरा दिवसापूर्वीच ठरला आहे आता ते तुमच्याकडे येऊ शकणार नाहीत असे सांगताच श्री. गोडबोले मोठयाने म्हणाले '' लोकमान्यांना शिक्षा झाली त्यावेळी 'पिकेटिंग' केले म्हणून आम्हाला शाळेत शिक्षा भोगावी लागली. त्याच लोकांनी ही शाळा काढली आहे'' [1] हे ऐकताच लोकमान्य टिळकांनी फक्त दहा मिनिटेच शाळेला भेट दिली मुख्याध्यापकांनी 'भगवतगीतेतील कर्मयोगावर मराठीत भाष्य लिहिणाऱ्या व कर्मयोग आचरणात आणणाऱ्या आचार्यांचे मी स्वागत करतो' असे भाषण केले. टिळकांनीही आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना उपदेश केला की,'' तुमच्या मुख्याध्यापकांच्या अंगी जे धाडस व धैर्य आहे ते आपल्या अंगी आणण्याचा प्रयत्न करा''[2] अन्याया विरुध्द आवाज उठवण्यास व धाडसी बनण्यास प्रवृत्त करणारे लोकमान्य टिळकांचा संदेश सर्व शाळातून घडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहे.

लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव ज्या हेतूने सार्वजनिक केला तो राष्ट्रीय जागृतीचा हेतू लक्षात घेऊन इ. स. १९२०-२१ हया शैक्षणिक वर्षापासून गणेशोत्सवासारखे धार्मिक उत्सव, उच्च राष्ट्रीय भावना जागृत करणारे व एकीस पोषक ठरणारे असल्याने आज संस्थेच्या सर्व शाखातून गणेशोत्सव मोठया धामधुमीने साजरा केला जातो. त्यामध्ये विटयाची 'महात्मा गांधी विद्यामंदीर' विटा ही शाळा मोठया उत्साहाने गावातून ढोल, ताशा, टिपरी, लेझीम, मंगळागौरी ची गाणी व तत्कालीन सामाजिक प्रश्न उचलून त्यांची जनजागृती या मिरवणुकीच्या माध्यमातून केले जाते. विद्यार्थी, शिक्षक वृंद, पालक, गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती, माजी विद्यार्थी, सेवक वर्ग सामील होतात.

स्काऊट प्रशिक्षण ( बालवीर चळवळ ) याबाबत त्यावेळेचे व्हाईसरॉय लॉर्ड आयर्विन यांच्या मते - '' या चळवळीने जाती - पंथ आणि धर्म यामुळे उत्पन्न होणारे मतभेद नाहीसे होतात म्हणून हिंदी तरुणांनी या चळवळीचा अंतःकरणपुर्वक स्वीकार करावा.[३] शिक्षण हे सर्व जाती - धर्माच्या, पंथाच्या युवकांच्यासाठी असून युवकांच्यामध्ये शिस्त, चांगले नागरिकत्व आणि राजनिष्ठा यांचे शिक्षण, शील, स्वावलंबन व परोपकार हे गुण नागरिकांच्या अंगी यावेत व बालवीर चळवळीचे ध्येयच आहे की, उत्कृष्ट नागरिक घडविणे. आपल्यातील उणीवा भरुन काढण्यासाठी बालवीर चळवळ आहे असे उपक्रम ही या संस्थेच्या सर्व शाखांमधून राबवले गेलेत.

स्वातंत्र्याच्या काळामध्ये किर्लोस्करवाडी हे चळवळीचे मोठे केंद्र होते. आणि संस्थेच्या शाळेचा छूपा सहभाग या चळवळीत होता. किर्लोस्कर कारखान्याने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून सर्व शिक्षकांना त्याच्या एक महिन्याच्या कायम पगारा इतकी रक्कम बोनस म्हणून दिले होते. विटयाची 'न्यू इंग्लिश स्कूलला (पूर्वीचे नाव) नगरपालिकेकडून शाळेसाठी काही प्रमाणात अनुदान मिळत होते. तत्कालीन नगराध्यक्ष आबासाहेब पाटील यांनी शाळेकडे १८/०६/१९३९ च्या पत्राने विनंती केली की, ''कॉग्रेसचा तिरंगा ध्वज न्यू इंग्लिश स्कूलच्या इमारतीवर लावावा.''[४] पण सरकारी शिक्षण खात्याकडून परवानगी मिळत असेल तर संस्थेची हरकत नाही. असे ठामपणे सांगितले.

विद्यार्थ्यांच्या मनामध्ये देशाविषयी आदर, प्रेम, राष्ट्रीय भावना निर्माण व्हावी यासाठी त्याकाळातील परिस्थितीचे भान विद्यार्थ्यांना व्हावे म्हणून १९४४-४५ या वर्षात सिटी हायस्कूलमध्ये ''हल्लीची युध्दकला'' थेट रणांगणाशी जाऊन भिडणारा विषय श्री. मधूकर आपटे यांनी मांडला होता.[५] मराठा पलटणीतील सैनिक श्री. सुबराव जाधव यांनी स्वतः ''युध्दकैदी असतानाचे अनुभव'' कथन अंगावर शहारे आणणारे होते. महात्मा गांधी विद्यामंदिराचे गुरुवर्य - गुंडो दासो कंपली सरांनी हैद्राबाद विजयानिमित्त आवेशपूर्ण भाषण झाले. साहित्यिक श्री दिपाकर कृष्ण यांचे कालचा, आजचा, उद्याचा हैद्राबाद या विषयावरील व्याख्याने आयोजित करुन, मन, मेंदू मनगट बळकट करण्याचा प्रयत्न केला होता. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 'स्वातंत्र्य मिळालं पुढे काय ? अशा गहन गंभीर विषयावर निबंध लिहून विद्यार्थ्यांच्या विचार स्वातंत्र्याच्या शक्तीला संधी दिली तसेच '' स्वतंत्र राष्ट्रातील विद्यार्थी'' या विषयावर मधूकर आपटे यांचे ही व्याख्याने आयोजित केले होते. विद्यार्थ्यांच्या मध्ये स्वतंत्रतेने विचार करण्याची वृत्ती निमार्ण करणे हाच हेतू होता.

## *मुल्यमापन –*

१) ब्रिटिश कालीन, स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर संस्था म्हणून सांगली शिक्षण संस्थेचा उल्लेख करावा लागेल.
२) १०३ व्या वर्षात पदार्पण करत असतानाही 'राष्ट्रीय शिक्षण देणारी संस्था' असाच तिचा लौकिक आहे.
३) मन, मेंदू व मनगट बळकट करण्याचा सातत्याने प्रयत्न करत आहे.
४) सूतकताई शिक्षण, व्यायाम, नैतिक मूल्य, हस्तव्यवसाय संगीत समाजसेवा यांचे ही शिक्षण दिले जाते.
५) टिळकांच्या विचारांना प्रेरणास्थानी ठेवून संस्था उपक्रम राबवते.
६) कायदयाच्या चौकटीत राहून संस्था काम करताना दिसते.

## *संदर्भ साधने*

१) सांगली शिक्षण संस्था सिटी हायस्कूल १९१४ - २०१४ इतिहास, ग्रंथ, प्रकाशक नितिन खाडिलकर, अध्यक्ष, सांगली शिक्षण संस्था, संकलक व लेखक वसंत आपटे, पा. नं. ७८,७९.
विजय बक्षी ग्रंथपाल, सिटी हायस्कुल, सांगली लिखित '' लो. टिळकांपासून स्फूर्ती घेऊन सुरु आलेली शाळा आणि संस्था निमित्त एका शिक्षेच्या शताब्दीचे'', तुषार वार्षिक अंक २००८-२००९ पा. नं. ख.......ग.
२) लेखक व संकलक वसंत आपटे, सा. शि. सं. सिटी हायस्कूल १९१४-२०१४ इतिहास ग्रंथ पा. नं. ७९.
३) इतिहास ग्रंथ- सां. शि. सं. सिटी हायस्कूल १९१४-२०१४ लेखक व संकलक वसंत आपटे पा. नं. १३७
४) इतिहास ग्रंथ - सां. शि. सं. सिटी हायस्कूल १९१४-२०१४ लेखक व संकलक वसंत आपटे लिखित अंतर्गत स्थिरस्थावर या लेखातून
५) ईश्वर मुदकाप्पा रामण्णवर लिखित ''शतकातील व्याख्यानमाला - प्रवास संस्कार सिंधूचा (पुष्प ४) प्रकाशन - कार्यवाह सांगली शिक्षण संस्था, पा. नं. ३७ शतपदी १९४४ - १९५३ खंड ४.